## निवडक

### पारवडेश्वर संप्रदाय मठ केरी सत्तरीचा आज वर्धापनदिन



■ टीम दैनिक हेराल्ड

**साखळी, दि. ५ :** श्री पारवडेश्वर संप्रदाय मठ केरी सत्तरीचा वर्धापनदिन सोहळा गुरुवार दि. ६ रोजी संप्रदायाचे विद्यमान पिठाधीश विश्वशांतिदूत प. पू. श्री श्री श्री सद्गुरू भाऊ महाराज यांच्या पावन उपस्थितीत आणि मान्यवरांच्या सांनिध्यात सकाळपासून विविध कार्यक्रमानिशी साजरा होणार आहे.

यानिमित्त सकाळी ५ वाजता काकड आरती, अखंड नामजप, भजन, हरिपाठ, दुपारी १ वाजता आरती, तीर्थप्रसाद व महाप्रसाद होणार आहे.

दुपारी ३.३० वाजता टाळ मृदूंगांच्या गजरात दिंडीच्या मिरवणूकितून पूज्य पिठाधिशांचे मठात आगमन, सुहासिनींकडून औक्षण व कुंकूमार्चन होणार असून या कार्यक्रमाचे यजमान सौ.प्रतिमा व श्री.आनंद गावस आहेत तर पाद्यपूजा यजमान सौ. धनश्री व श्री. रवींद्र हळीत आहेत.

संध्याकाळी ६ वाजता श्री सचीदानंद महात्माजी यांचा वाढदिवस सोहळा होणार आहे. ६.३० वाजता दिंडी सादरीकरण, ७ वाजता पूज्य पिठाधिश श्री श्री श्री भाऊ महाराज यांचे आशिर्वचन, ७:३० वाजता ह.भ.प.कु. नेहा उपाध्ये यांचे सुश्राव्य कीर्तन होणार असून त्यांना ऑर्गन साथ गोपीनाथ गावस व तबला साथ संकेत खलप करणार आहेत.

रात्री ९.३० वाजता आरती, तीर्थप्रसाद व रात्रीच्या महाप्रसादाने कार्यक्रमाची सांगता होईल. कार्यक्रमास कुटुंबीय, आप्त इष्ट मित्रमंडळीनी या सोहळ्यास उपस्थित राहावे असे आवाहन अध्यक्ष व कार्यकारी मंडळ, श्री पारवडेश्वर मठ केरी सत्तरी, शिष्य,भक्त आणि समस्त वारकरी परिवारतर्फे करण्यात आले आहे.

---

### साखळी कोकणी सेवा केंद्राची १६ रोजी सर्वसाधारण सभा


■ टीम दैनिक हेराल्ड

**साखळी, दि. ५ :** साखळी येथील कोकणी सेवा केंद्राची वार्षिक सर्वसाधारण सभा रविवार दि. १६ रोजी सकाळी १० वाजता संस्थेच्या कार्यालयात घेण्यात येणार आहे.

नवीन अंदाज पत्रकास मान्यता घेणे आणि नवीन समिती निवड करणे हे दोन विषय या सभेत घेण्यात येणार आहेत. समितीच्या निवडणुकीत भाग घेण्यासाठी इच्छुक उमेदवारांना राजन शेट्ये, रघुदास तारी, अनिल वेर्णेकर आणि प्रदीप लवंदे यांच्याकडे अर्ज उपलब्ध असतील, असे संस्थेचे सचिव रघुदास तारी यांनी कळविले आहे.

---

### चंद्रकांत गावस यांच्या 'सावड' कादंबरीला शिवांजली साहित्य सन्मान पुरस्कार



■ टीम दैनिक हेराल्ड

**साखळी, दि. ५ :** कादंबरीकार चंद्रकांत महादेव गावस यांना त्यांच्या 'सावड' कादंबरीला महाराष्ट्र साहित्य परिषद राजगुरूनगर खेड पुणे येथील लोकशाहीर अण्णा भाऊसाठे स्मृती कादंबरी पुरस्कार प्राप्त झाल्यानंतर आता याच त्यांच्या कादंबरीला दुसरा 'शिवांजली साहित्य सन्मान पुरस्कार' प्राप्त झाला आहे. शिवांजली साहित्य पीठ व महाराष्ट्र साहित्य परिषद पुणे चाकळवाडी शाखा यांच्या वतीने ३२ व्या राज्यस्तरीय शिवांजली मराठी साहित्य महोत्सव २०२५ मध्ये दिला.

चंद्रकांत महादेव गावस यांच्या पाली, पिळगी, परीस, कलंकिनी, इदवास या कादंबऱ्या, सावड, वळवाचा पाऊस, पानगळ हे ललित साहित्य, हुंकार, जात्यावरील ओव्या हे लोकसाहित्य, मळ–परिमळ हे व्यक्ती चित्र पुस्तक प्रकाशित झाले आहे.

पुरस्कार–पाली कादंबरीस गोमंतक मराठी अकादमी पुरस्कार, कला अकादमी पुरस्कार, इदवास कादंबरीस ना. सी. फडके पुरस्कार पुणे, गोमंतक मराठी अकादमी पुरस्कार गोवा,कला अकादमी पुरस्कार गोवा,दि गोवा हिंदु असोसियेशन मुंबईचा बा. भ. बोरकर पुरस्कार, सावड पुस्तकास सांगाती अकादमी पुरस्कार बेळगाव,

जिवन गौरव पुरस्कार, कामेरी सांगलीचे पुरस्कार प्राप्त झाले असून इयत्ता ७ वीच्या पुस्तकात 'मन करा रे प्रसन्न' व 'कायापालट' हे दोन धडे आणि आठवीच्या पुस्तकात 'संत तिरुवल्लुवर' हा धडा समाविष्ट करण्यात आला आहे. गोवा विद्यापीठात पाली व जात्यावरील ओव्या या दोन पुस्तकांचा समावेश आहे. इदवास ही कादंबरी द्वितिय वर्ष बी.ए.साठी समाविष्ट आहे. 'भक्तोद्धार' मासिकाचे संस्थापक संपादक आहेत. गोमंतक मराठी साहित्य परिषदेचे संस्थापक अध्यक्ष आहेत. अनेक वर्तमानपत्रातून सदर लेखन ते करतात. गोमंतक मराठी अकादमी व बिल्वदल आयोजित साहित्य संमेलनाचे अध्यक्षपदाचा मान त्यांना प्राप्त झाला आहे. अनेक साहित्य संमेलनात वक्ता म्हणून सहभाग, आतापर्यंत पाच साहित्य संमेलनाचे आयोजन त्यांनी केले आहे.

---

### विकास हायस्कूलमध्ये विज्ञान दिन साजरा उत्साहात



**वळपे : विज्ञान दिननिमित्त कार्यक्रमात विद्यार्थी.**

■ टीम दैनिक हेराल्ड

**पेडणे, दि. ५ :** वळपे पेडणे येथील विकास हायस्कूलमध्ये विज्ञान दिन साजरा करण्यात आला यावेळी सर्वप्रथम हायस्कूलचे मुख्याध्यापक नागेश गोसावी व शिक्षक प्रतिनिधी रत्नाकर राव यांनी सी. व्ही. रमन यांच्या प्रतिमेस पुष्पहार अपर्ण केला त्यानंतर पाचवीच्या मुलींनी एक विज्ञान गीत सादर केले. अस्मिता परब याने भाषण केले. तर नववीच्या मुलींनी पर्यावरणावर एक पथनाट्य सादर केले.

यावेळी मुलांसाठी वैज्ञानिक प्रतिकृती तयार करणे व प्रयोगातून विज्ञानातील काही प्रात्यक्षिकेही मुलांनी करून दाखविली. त्यानंतर विविध गटामधून प्रश्नमंजुषा स्पर्धा घेण्यात आल्या.

पुराणतन काळापासून ते आजपर्यंत विज्ञानाचे झपाट्याने अशी प्रगती केली आहे. या देशाला अनेक शास्त्रज्ञ व वैज्ञानिक लाभले तेव्हा हे वैज्ञानिकाबद्दल वाचनालयातून साहित्य वाचा व वैज्ञानिक दृष्टिकोन निर्माण करा, असे वरील प्रसंगी बोलत असताना मुख्याध्यापक नागेश गोसावी म्हणाले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन विज्ञान शिक्षिका रीमा सातार्डेकर यांनी केले.

---

# शानदार विजयासह न्यूझीलंड फायनलमध्ये

## भारत-न्यूझीलंड भिडणार | द. आफ्रिकेचा उपांत्य फेरीत ५० धावांनी पराभव

**दुबई, दि. ५ :**

चॅम्पियन्स ट्रॉफी २०२५ च्या उपांत्य फेरीत न्यूझीलंडने दक्षिण आफ्रिकेचा धावांनी दारूण पराभव करत अंतिम फेरीत स्थान मिळवले आहे. आता चॅम्पियन्स ट्रॉफीचा अंतिम सामना भारत वि. न्यूझीलंड या संघांमध्ये होणार आहे. न्यूझीलंडने प्रथम फलंदाजी करताना चॅम्पियन्स ट्रॉफीच्या इतिहासातील विक्रमी धावसंख्या उभारत दक्षिण आफ्रिकेच्या संघाला मोठं आव्हान दिलं होतं. पण सातत्याने विकेट्स गमावल्याने आफ्रिकेचा संघ मागे राहिला. पण दक्षिण आफ्रिकेकडून डेव्हिड मिलरने अखेरच्या चेंडूवर शतक पूर्ण करत सर्वांचं लक्ष वेधून घेतलं.

भारत वि. न्यूझीलंड यांच्यातील सामना दुबईत ९ मार्चला खेळवला जाणार आहे. भारतीय संघाने ऑस्ट्रेलियाला उपांत्य फेरीत ४ विकेट्सने पराभूत करत आधीच अंतिम फेरीत स्थान मिळवले होते. तर आता न्यूझीलंडने आफ्रिकेला पराभूत करत फायनलचं तिकिट मिळवली. न्यूझीलंड संघाने दिलेल्या ३६३ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना आफ्रिकेचा संघ ९ विकेट्स गमावत ३१२ धावाच करू शकला. उत्कृष्ट लयीत असलेला रायन रिकल्टन १७ धावा करत बाद झाला. तर कर्णधार टेम्बा बावुमा आणि रॅसी व्हॅन डेर ड्युसेन यांनी चांगली भागीदारी रचली पण संघाला विजयापर्यंत नेऊ शकले नाही. बावुमाने ७१ चेंडूत १ षटकार आणि ४ चौकारांसह ५६ धावा केल्या आहेत. तर ड्युसेनने ६६ चेंडूत २ षटकार आणि ४ चौकारांसह ६९ धावा केल्या. आफ्रिकेला सर्वात मोठा धक्का बसला तो म्हणजे क्लासेनच्या रूपात. क्लासेन ३ धावा करत बाद झाला. मारक्रम चांगल्या लयीत होता पण तो ३१ धावा करत बाद झाला.





मिलर वगळता आफ्रिकेच्या खलच्या फळीतील कोणालाच मोठी कामगिरी करता आली नाही. पण डेव्हिड मिलरने अखेरच्या चेडूवर आपले शतक पूर्ण केले. मिलरने अवघ्या ६७ चेंडूत १० चौकार आणि ४ षटकारांसह शतक पूर्ण केले. न्यूझीलंड संघाच्या गोलंदाजांनी उत्कृष्ट कामगिरी करत संघाला विकेट मिळवून दिल्या. मॅट हेन्री आणि ग्लेन फिलीप्सने प्रत्येकी २ विकेट घेतले. तर कर्णधार मिचेल सँटनरने सर्वाधिक ३ विकेट्स घेतले. मायकेल ब्रेसवेल आणि रचिन रवींद्र यांना १–१ विकेट घेता आली.

न्यूझीलंड संघाने या सामन्याची नाणेफेक जिंकत प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला आणि चॅम्पियन्स ट्रॉफीच्या इतिहासातील सर्वात मोठी धावसंख्या ३६२ धावा उभारल्या. न्यूझीलंडकडून रचिन रवींद्र आणि केन विल्यमसनने संघाच्या मोठ्या धावसंख्येचा पाया रचला. रचिनने १०८ धावा तर विल्यमसनने १०२ धावा करत या दोन्ही खेळाडूंनी आपआपली शतकं पूर्ण केली. यानंतर डॅरिल मिचेल आणि ग्लेन फिलीप्स यांनी वादळी फलंदाजी करत ४९–४९ धावांची खेळी केली. तर मायकेल ब्रेसवेलने १६ धावा केल्या.

न्यूझीलंडच्या फलंदाजांवर वचक बसवण्यात आणि झटपट विकेट्स घेण्यात आफ्रिकेचे गोलंदाज अपयशी ठरले आणि त्यांना इतक्या मोठ्या पराभवाला सामोरे जावे लागले. आफ्रिकेकडून लुंगी एनगिडीने ३ विकेट्स, रबाडा २ विकेट्स तर वियान मुल्डर एक विकेट घेऊ शकले.

---

# महादेव भूमिका देवस्थानचा वर्धापनदिन उत्साहात

■ टीम दैनिक हेराल्ड

**साळ, दि. ५ :** साळ येथील श्री महादेव भूमिका पंचायतन देवस्थानचा वर्धापनदिन विविध धार्मिक सांस्कृतिक आणि मनोरंजनात्मक कार्यक्रमाचे उत्साहात झाला.

दोन दिवस चाललेल्या या वर्धापनदिन सोहळ्यात पहिल्या दिवशी महादेव मंदिरात सौ. अमिता व श्री. जयवंत विश्वास तसेच सौ. मनिषा व श्री. चंद्रशेखर निळू परब यांच्या यजमानाखाली ग्राम पुरोहित सदाशिव गाडगीळ, यशवंत गाडगीळ, शंकर गाडगीळ व वेद शास्त्री बाळकृष्ण (बाबी) जोशी (मांद्रे – पेडणे) यांच्या पौरोहित्याखाली संग्रह शिवकवच महा अनुष्ठान, महापूजा व इतर धार्मिक कार्यक्रम पार पडले.

दुसऱ्या दिवशी भूमिका मंदिरात सौ. प्रमिला व श्री. प्रमोद नागेश राऊत तसेच सौ. मनिषा व श्री. चंद्रशेखर निळू परब या दोन्ही दाम्पत्याच्या यजमानाखाली पुरोहितांच्या पौरुहिता खाली श्रीदेवी भूमिका मातेला संग्रह त्रिशक्ती याग अनुष्ठान, महापूजन, अग्निस्थापन, नवग्रह होम, बलिदान, पूर्णाहुती, मंत्र पुष्पांजली, सार्वजनिक गाऱ्हाणे, तीर्थप्रसाद व त्यानंतर महाप्रसाद झाला.

महाप्रसाद करण्यासाठी साळ येथील प्रेमानंद बायकर, दयानंद भाईप, शाबी गवस, सुरेश शेटकर, संदीप घोगळे,



**साळ : येथील श्री भूमिका मंदिरात कुंकूमार्चन करताना सुहासिनी. सोबत पुरोहित व भाविक.**

मुकुंद परब, दिलीप परब, सत्यवान परब, अमित बायकर व इतर युवकांनी व महिलांनी कष्ट घेतले येथील अनुभवी युवकांनी जेवण करण्यासाठी तर महिलांनी भाजी चिरणे व शिजवण्यासाठीची पूर्वतयारी साठी कंबर कसली. दुपारी दोन वाजता महाप्रसादला सुरुवात झाली तब्बल पाच वाजेपर्यंत महाप्रसादाचा कार्यक्रम चालू होता .यात अंदाजे तीन हजार पेक्षा अधिक भाविक उपस्थित होते.

तद्नंतर संध्याकाळी देवस्थान समितीच्या नियमावलीप्रमाणे पार नंबर ३, साळ – मधलावाडा मधील परब व राऊत महाजनानी देवस्थानचा कार्यक्रम व श्रीच्या पालखी मिरवणुकीची सूत्रे आपल्या हातात घेतली. पालखी उत्तम व सुंदररित्या सजवण्यात आली. संध्याकाळी १२ अंधाराच्या (अवसाराच्या) साथीने ढोल ताशाच्या गजरात संध्याकाळी ६.०० वाजता श्री ची पालखी मिरवणूक श्री सिद्धेश्वर मंदिर (वरचावाडा) ते महादेव मंदिर या मार्गावर गावातील सुहासिनी व भाविकांनी ठिक ठिकाणी श्रींची ओटी भरण्याचा कार्यक्रम पार पडला तर नंतर रात्री १२.३० वाजता पार नं. ३ च्या वतीने गोकुळदास मुळवी लिखित शिवराम राऊत दिग्दर्शीत 'तू आई आहेस का?' हे नाटक सादर केले.

दुसऱ्या दिवशी 'संगीत अमृत मोहिनी' हे नाटक सादर करण्यात आले. देवस्थान समितीचे अध्यक्ष कालिदास राऊत, सचिव विशाल परब, खजिनदार प्रमोद राऊत व सदस्य यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रमाचे आयोजन करून सोहळा यथासांग पार पडला.

---

# कला अकादमीतर्फे 'प्रतिभा' शास्त्रीय गायन, वादनाचा कार्यक्रम

■ टीम दैनिक हेराल्ड

**पणजी, दि. ५ :** कला अकादमीच्या हिंदुस्थानी संगीत व नृत्य विभागातर्फे आयोजित 'प्रतिभा' शास्त्रीय गायन, वादन व नृत्याचा कार्यकम कला अकादमीच्या कृष्णाकक्षांत झाला.सर्वप्रथम कार्यकमाचे प्रमुख पाहुणे व कला अकादमीचे सदस्य सचिव अरविंदखुटकर यांच्या हस्ते दीपप्रज्वलनाने कार्यकमाचे उद्‌घटन झाले. त्याच्या सोबत संगीत विभागाचे प्रभारी संचालक रुपेश गावस, गोवा सरकारच्या आरोग्य खात्याच्या

संयुक्त सचिव तृप्ती मणेरीकर तसेच इतर कर्मचारी वर्ग उपस्थित होते.

याप्रसंगी प्रमुख पाहुणे अरविंद खुटकर यांनी विद्यार्थ्यांना बहुमोल असे मार्गदर्शन केले.उद्‌घाटनाच्या कार्यकमानंतर सर्वप्रथम कथ्थक नृत्याचा कार्यकम झाला त्यामध्ये वरदा चव्हाण, विभा षळशव, वेदा देसाई व स्फुर्ती शानबाग यांनी आपली कला सादर केली त्यांना पढंतवर वदरा बेडेकर, तबल्यावर सुरज मोरजकर, संवादिनीसाथ शुभम नाईक व सो. सम्राज्ञी आईर यांची गायनसाथ लाभली.त्यानंतर उत्कर्षा फोंडेकर हिने संवादिनी वादनात राग–नटभैरव पेश केला. त्यांना भार्गवराम गर्दे यांनी तबला साथ केली. संवादिनीवादनानंतर पेडणे संगीत केंद्रातील विद्यार्थ्यांनी तबला सहवादनात ताल तिनताल सादर केला त्यामध्ये रोहन सोपटे व हनुमंत तळवणेकर हे विद्यार्थी सहभागी झाले होते. त्यांना वेदेश बाणावलीकर

यांनी नगमा साथसंगत केली. शास्त्रीय गायनाच्या कार्यकमात सत्यनारायण कळंगुटकर यांचे गायन झाले. त्यानी राग पुरियाधनाश्री मध्ये विलंबीत ख्याल व त्याला जोडून दृत बंदिश सादर केली. त्यांना गितेश मांद्रेकर यांची तबलासाथ व चारुदत्त गावस यांची संवादिनी साथसंगत लाभली. त्यांनंतर नीलेश वराडकर यांचे तबला एकलवादन झाले. त्यानी तिनताल पेश केला त्यांना चारुदत्त गावस यांनी नगमा साथ केली. त्यानंतर यश आपटे यांचे बासरीवादन झाले. त्यांनी मध्यलय झपतालात व नंतर दृत तिनतालात राग वृंदावनी सारंग पेश केला त्यांना सुरज मोरजकर यांनी तबला साथ केली व नंतर कार्यकमाची सांगता अनिषा यादव, शुभ्रा आचार्य, गिना पाडगावकर, श्रव्या शेट, आभा नाडकर्णी, सान्वी केंकरे, शताक्षी फळगावकर, आरोही सुभेदार, सोनम कांदे, इशिता शेटकर, वरालीका पिसुर्लेकर यांच्या भरतनाटयम नृत्याने झाली. त्यांना नटवंगमवर मंदिरा तिरोडकर, मृदंगमसाथ श्री. चेथनमुर्ती डी. आर व दिप्ता रुबसुदंरम यांची गायनसाथ लाभली. या कार्यकमासाठी सर्व पालक व रसिक श्रोते मोठया संख्येने उपस्थित होते. संपूर्ण कार्यकमाचे सूत्रसंचालन सचिन तेली व उमा नाईक यांनी केले. तर मंदिरा तिरोडकर यांनी सर्वांचे आभार मानले.



---

# बांदेश्वर बांदा संघास जेतेपद

## हरमल वेदांत क्लब स्पर्धा | हरमल ९६ रायझर्स उपविजेता

■ टीम दैनिक हेराल्ड

**हरमल, दि. ५ :** हरमल येथील वेदांत इलेव्हन आयोजित गोवा व सिंधुदुर्ग मर्यादित पंचायत व नगरपालिका क्षेत्रासाठी, ६ ओव्हरच्या टेनिस बॉल क्रिकेट स्पर्धेत हरमल ९६ रायझर्स संघाचा पराभव करून बांदेश्वर बांदा संघास जेतेपद प्राप्त झाले. या स्पर्धेत १६ संघांनी भाग घेतला होता.

पालये किरणपणी (आरोंदा) विद्युत झोतात खेळविण्यात आलेल्या या स्पर्धा विजेत्यांना रोख रु. १ लाख ११ हजार २२२ व चषक व उपविजेत्या हरमल संघास रोख रु. ५५ हजार व चषक देण्यात आले. उपांत्य फेरीत श्रेयस निरवडे व शेट्ये ब्रदर्स कोरगाव यांना रोख रु. १५ हजार ५५५ व चषक देण्यात आले.

बक्षीस वितरण सोहळ्यात मांद्रे मतदारसंघाचे आमदार तथा गोवा हाऊसिंग बोर्डाचे चेअरमन जीत आरोलकर तसेच सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाचे अध्यक्ष संतोष कोरकणकर, राजेश





**हरमल : वेदांत क्रिकेट क्लबच्या विजेत्यांना बक्षिसे देताना आमदार जीत आरोलकर. सोबत संतोष कोरकणकर, हरेश मयेकर, मयुरेश विर्नोडकर, प्रवीण वायंगणकर, आपा वायंगणकर,हरी वायंगणकर व इतर.**

नानोस्कर,माजी पंच प्रवीण वायंगणकर, कोरगाव पंच अब्दुल नाईक, समाज कार्यकर्ते मयुरेश विर्नोडकर, हरेश मयेकर, हेमंत सावंत, अरोंदाचे सरपंच नाईक, हरी वायंगणकर, बाली वायंगणकर, सज्ञन गडेकर,विनय गडेकर, प्रकाश केपकर, राजन वायंगणकर आदी उपस्थित होते. मांद्रे मतदारसंघात खेळण्यायोग्य मैदान नसल्याची खंत असून, उदरगत संस्थेतर्फे तुये येथे ४० हजार चौरस मीटर जागा केवळ क्रीडा स्पर्धा आयोजन करण्यासाठी असून त्यात फ्लडलाईट व अन्य सुविधा असतील. त्याचा वापर क्रीडा संस्था विनाशुल्क करू शकता.आपण क्रीडापटू असल्याने क्रीडाप्रेमींसाठी हि खुशखबर आहे व ह्या स्पर्धेत सहभाग घेऊन आनंद लुटण्याचे आवाहन आमदार जीत आरोलकर यांनी केले.

वैयातिक गटात अंतिम सामनावीर व मालिकावीर राजेश सोरटी, उत्कृष्ठ गोलंदाज तुषार रणदिवे, उत्कृष्ठ फलंदाज रजत कुडाळकर यांना देण्यात आले. प्रारंभी क्लबतर्फे वेदांत, पियूष, भानुदास, ब्रिजेश वायंगणकर यांनी मान्यवरांना पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले. सूत्रनिवेदन आकाश बादल तर क्लबचे अध्यक्ष विठ्ठल (आपा) वायंगणकर यांनी आभार मानले.

---

# 'औषधी रासायनशास्त्रातील नैसर्गिक पदार्थ' विद्याप्रसारक विद्यालयात व्याख्यान

■ टीम दैनिक हेराल्ड

**पेडणे, दि. ५ :** विद्याप्रसारक विद्यालय मोरजी येथे राष्ट्रीय विज्ञान दिनानिमित्त गोवा सरकारच्या 'विज्ञान धारा २०२५' या कार्यक्रमाअंतर्गत 'औषधी रासायनशास्त्रातील नैसर्गिक पदार्थ' या विषयावर सरकारी महाविद्यालय साखळीचे विज्ञान विषयाचे प्राध्यापक डॉ. दीपेश सखाराम हरमलकर यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. या प्रसंगी व्यासपीठावर विद्याप्रसारक समाजाचे अध्यक्ष गणेश शेटगावकर तसेच शाळेचे मुख्याध्यापक दिलीप मेथर उपस्थित होते.

आयुर्वेद हा विषय आपल्या भारतासाठी किंवा आम्हा भारतीयांसाठी नवीन नसून पुरातन काळापासून आम्ही भारतीय विविध नैसर्गिक घटकांचा वापर औषधाच्या रूपाने नियमितपणे करत असतो. आयुर्वेद हे आपल्या स्वयंपाक घरातूनच सुरू होत असून आम्हा सर्वांचे पूर्वज याचाच वापर करून सुदृढ आयुष्य जगत होते. आजच्या बदलत्या काळात आपल्या पूर्वजांनी दिलेला ज्या आयुर्वेदाचा ठेवा आपण विसरत चाललो आहोत त्याचीच ओळख करून देणारे व्याख्यान विद्याप्रसारक विद्यालयात घेण्यात आली. यावेळी डॉ. दीपेश सखाराम हरमलकर यांनी आपल्या स्वयंपाक घरातील वेगवेगळ्या पदार्थांमध्ये कोणते रसायनिक घटक उपस्थित असतात आणि त्यांचा वापर आयुर्वेदात कशाप्रकारे केला जातो याचे स्पष्टीकरण मुलांना दिले. त्यांनी मुलांना विविध प्रश्न विचारू त्यांच्याकडून विज्ञानावर आधारित उत्तर घेतली. डॉ. दीपेश यांनी विचारलेल्या प्रत्येक प्रश्नाची मुलांनी अचूक उत्तरे देत विज्ञानातील आणि आयुर्वेदातील आपल्या ज्ञानाचे प्रदर्शन केले. विद्याप्रसारक समाजाचे अध्यक्ष गणेश शेटगावकर हे स्वतः एक रसायनशास्त्रज्ञ असल्याने त्यांनी स्वतःचे अनुभव याप्रसंगी व्यक्त करत मुलांना विज्ञान क्षेत्रात काम करण्यासाठी प्रेरित केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शिक्षिका कुमारी हर्षा नाईक यांनी केले. प्रमुख वक्त्यांची ओळख मुख्याध्यापक दिलीप मेथर यांनी केली. तर शिक्षिका मंजिरी शेटगावकर यांनी आभाराने कार्यक्रमाची सांगता केली.

RNI No. GOAMAR/2013/49899 **दैनिक हेराल्ड** वर्ष १३, अंक १८२ **मालक:** हेराल्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., **प्रिंटर:** श्री. वॉल्टर लिगोरिओ डिसोझा, **प्रकाशक:** श्री. वॉल्टर लिगोरिओ डिसोझा, **प्रकाशन स्थळ:** हेराल्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., प्लॉट क्र. एल – १३५, फेज २, वेर्णा औद्योगिक वसाहत, वेर्णा, सालसेत, गोवा, **छपाई स्थळ:** हेराल्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., प्लॉट क्र. एल – १३५, फेज २, वेर्णा औद्योगिक वसाहत, वेर्णा, सालसेत, गोवा. **एडिटर इन चीफ:** श्री. आर. एफ. फर्नांडिस, **संपादक:** श्री. दिनेश वासुदेव केळुस्कर (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी).

RNI No. GOAMAR/2013/49899 **Dainik Herald** Volume 13, Issue 182 **Owner:** Herald Publications Pvt. Ltd., **Printer:** Mr. Walter Ligorio D'Sousa, **Publisher:** Mr. Walter Ligorio D'Sousa,, **Published from:** Herald Publications Pvt. Ltd., Plot No. L - 135, Phase II, Verna Industrial Estate, Verna, Salcete, Goa and **Printed from**: Herald Publications Pvt. Ltd., Plot No. L - 135, Phase II, Verna Industrial Estate, Verna, Salcete, Goa. **Editor in Chief** Mr. R. F. Fernandes, **Editor :** Mr. Dinesh Vasudev Keluskar (Responsible under P.R.B. Act), .